# महाराष्ट्र शासनाच्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेसाठी प्रवेशिका व पुस्तके पाठविण्याचा कालावधी

## दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत

मराठी भाषेतील उत्कृष्ट वाङ्मय निर्मितीसाठी प्रकाशन वर्ष २०२५ करिता राज्य शासनाच्यावतीने देण्यात येणाऱ्या स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कारांसाठीच्या प्रवेशिका जिल्हाधिकारी कार्यालयात (मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून), तसेच महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ पर्यंत पाठविता येणार आहेत. दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत प्रकाशित झालेली प्रथम आवृत्ती पुस्तके या स्पर्धेसाठी पात्र आहेत. या स्पर्धेची नियमावली व प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ यांच्या कार्यालयात तसेच मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळता अन्यत्र संबंधित जिल्ह्यांचे जिल्हाधिकारी यांच्या कार्यालयात (सर्वसाधारण शाखा अथवा करमणूक शाखा) विनामूल्य उपलब्ध होतील. महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या संकेतस्थळावर 'नवीन संदेश' या सदरात 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ नियमावली व प्रवेशिका' या शीर्षाखाली व 'What's new' या सदरात 'Late Yashwantrao Chavan State Literature Award २०२५ Rules Book and Application Form' या शीर्षाखाली व महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या http://sahitya.marathi.gov.in या संकेतस्थळावर प्रवेशिका व नियमपुस्तिका उपलब्ध होतील. प्रवेशिका पूर्णत: भरुन आवश्यक साहित्यासह सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळाच्या कार्यालयात दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ या विहित कालावधीत पोहचतील अशा बेताने पाठवाव्यात. लेखक / प्रकाशक या स्पर्धेसाठी प्रवेशिका दाखल करु शकतात. मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील लेखक / प्रकाशकांनी पुस्तकांच्या दोन प्रतींसह विहित नमुन्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्यमंदिर इमारत, दुसरा मजला, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई ४०० ०२५ येथे पाठवाव्यात. मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून अन्य ठिकाणच्या लेखक / प्रकाशकांनी संबंधित जिल्ह्यांच्या जिल्हाधिकारी कार्यालयांमध्ये हे साहित्य दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६ या विहित कालावधीत पाठवावे, असे आवाहन सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ यांनी केले आहे. लेखक / प्रकाशकांनी मंडळाकडे प्रवेशिका व पुस्तके पाठविताना सदर बंद लिफाफ्यावर / पाकीटावर 'स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार २०२५ साठी प्रवेशिका' असा स्पष्ट उल्लेख करावा. प्रवेशिका व पुस्तके स्विकारण्याचा अंतिम दिनांक ३० जानेवारी, २०२६ हा राहील. विहित कालमर्यादेनंतर (१ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी २०२६) येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्विकारल्या जाणार नाहीत.

सचिव,
महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई

## महाराष्ट्र शासन

# स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना

# नियम व माहिती

---

**महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ**
रवींद्र नाट्य मंदिर इमारत, २ रा मजला,
पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार,
सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५.
दूरध्वनी क्रमांक - २४३२५९३१/ फॅक्स क्र. २४३२ ५९३१
संकेतस्थळ - https://sahitya.marathi.gov.in
ई-मेल - secretary.sblc-mh@gov.in

Raut

**जोडपत्र - १**

## स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना

या योजनेखाली प्रत्येक वाङ्मयीन विभागासाठी निश्चित करण्यात आलेले लेखन प्रकार व पुरस्काराची रक्कम पुढीलप्रमाणे आहे.

### पुरस्कारासाठी विभाग आणि साहित्य प्रकार

### (अ) प्रौढ वाङ्मय

(१) **काव्य**
कवी केशवसुत पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(२) **नाटक/एकांकिका**
राम गणेश गडकरी पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(३) **कादंबरी**
हरी नारायण आपटे पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(४) **लघुकथा**
दिवाकर कृष्ण पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(५) **ललितगद्य (ललित विज्ञानासह)**
अनंत काणेकर पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(६) **विनोद**
श्रीपाद कृष्ण कोल्हटकर पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(७) **चरित्र**
न.चिं. केळकर पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(८) **आत्मचरित्र**
लक्ष्मीबाई टिळक पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(९) **समीक्षा/वाङ्मयीन संशोधन/सौंदर्यशास्त्र/ललितकला आस्वादपर लेखन**
श्री.के. क्षीरसागर पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१०) **राज्यशास्त्र/समाजशास्त्र**
डॉ. बाबासाहेब आंबेडकर पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(११) **इतिहास**
शाहू महाराज पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१२) **भाषाशास्त्र / व्याकरण**
नरहर कुरूंदकर पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१३) **विज्ञान व तंत्रज्ञान (संगणक व इंटरनेटसह)**
महात्मा जोतीराव फुले पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१४) **शेती व शेतीविषयक पूरक व्यवसाय लेखनासह**
वसंतराव नाईक पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१५) **उपेक्षितांचे साहित्य (वंचित, शोषित, पिडीत, आदिवासी, कष्टकरी, अनुसूचित जाती व नव बौद्ध इत्यादी)**
लोकशाहीर अण्णाभाऊ साठे पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१६) **अर्थशास्त्र व अर्थशास्त्रविषयक लेखन**
सी.डी. देशमुख पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१७) **तत्त्वज्ञान व मानसशास्त्र**
ना.गो. नांदापूरकर पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१८) **शिक्षणशास्त्र**
कर्मवीर भाऊराव पाटील पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(१९) **पर्यावरण**
डॉ. पंजाबराव देशमुख पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(२०) **संपादित /आधारित**
रा.ना.चव्हाण पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(२१) **अनुवादित**
तर्कतीर्थ लक्ष्मणशास्त्री जोशी पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

(२२) **संकीर्ण (क्रीडासह)**
भाई माधवराव बागल पुरस्कार .. .. **रु.१,००,०००**

**प्रौढ वाङ्मय पुरस्कार एकूण रक्कम** **रु.२२,००,०००/-**

## (ब) बाल वाङ्मय पुरस्कार

(१) **कविता**
बालकवी पुरस्कार .. .. **रु.५०,०००**

(२) **नाटक व एकांकिका**
भा.रा. भागवत पुरस्कार .. .. **रु.५०,०००**

(३) **कादंबरी**
साने गुरुजी पुरस्कार .. .. **रु.५०,०००**

(४) **कथा (छोट्या गोष्टी, परिकथा, लोककथासह)**
राजा मंगळवेढेकर पुरस्कार .. .. **रु.५०,०००**

(५) **सर्वसामान्य ज्ञान (छंद व शास्त्रे)**
यदुनाथ थत्ते पुरस्कार .. .. **रु.५०,०००**

(६) **संकीर्ण**
ना.धों. ताम्हणकर पुरस्कार .. .. **रु.५०,०००**

**बाल वाङ्मय पुरस्कार एकूण रक्कम** **रु.३,००,०००/-**

## (क) प्रथम प्रकाशन

**प्रथम प्रकाशन या विभागात फक्त नवलेखकांनाच, म्हणजे ज्याचे यापूर्वी एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, अशा लेखकाचे प्रकाशित झालेले पहिलेच पुस्तक स्पर्धेसाठी सादर करता येईल. ("प्रथम प्रकाशन" या विभागात पहिल्या प्रकाशित पुस्तकासाठी प्रवेशिका सादर करताना लेखकांनी कृपया प्रवेशिकेत तसा स्पष्ट उल्लेख करावा. )**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | **काव्य** | | |
| | बहिणाबाई चौधरी पुरस्कार | .. .. | **रु.५०,०००** |
| (२) | **नाटक / एकांकिका** | | |
| | विजय तेंडूलकर पुरस्कार | .. .. | **रु.५०,०००** |
| (३) | **कादंबरी** | | |
| | श्री.ना. पेंडसे पुरस्कार | .. .. | **रु.५०,०००** |
| (४) | **लघुकथा** | | |
| | ग.ल. ठोकळ पुरस्कार | .. .. | **रु.५०,०००** |
| (५) | **ललितगद्य** | | |
| | ताराबाई शिंदे पुरस्कार | .. .. | **रु.५०,०००** |
| (६) | **समीक्षा सौंदर्यशास्त्र** | | |
| | रा.भा. पाटणकर पुरस्कार | .. .. | **रु.५०,०००** |

**प्रथम प्रकाशन पुरस्कार एकूण रक्कम रु. ३,००,०००/-**

## (ड ) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार

**बृहन्महाराष्ट्रातील उत्कृष्ट साहित्य निर्मितीसाठी पुरस्कार**

| | | | |
|---|---|---|---|
| (१) | सयाजी महाराज गायकवाड पुरस्कार | .. .. | **रु.१,००,०००** |

**सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार एकूण रक्कम रु.१,००,०००/-**

## जोडपत्र - २

## स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना

स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजनेअंतर्गत दिनांक १ जानेवारी, २०२५ ते ३१ डिसेंबर, २०२५ या कालावधीत प्रसिध्द झालेल्या प्रथम आवृत्ती पुस्तकांना निवडीअंती राज्य शासनाकडून पुरस्कार देण्यात येतात. या योजनेअंतर्गत पुढील साहित्य प्रकारांमध्ये पुरस्कार देण्यात येतात.

**(अ) प्रौढ वाङ्मय - २२ साहित्य प्रकार**

**(ब) बाल वाङ्मय - ६ साहित्य प्रकार**

**(क) प्रथम प्रकाशन - ६ साहित्य प्रकार**

**(ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार - सर्व साहित्य प्रकार**

**स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार या स्पर्धेचे नियम खालील प्रमाणे आहेत.**

**नियम**

(१) सन **२०२५** च्या स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार स्पर्धेसाठी पाठवावयाची पुस्तके **दिनांक ०१ जानेवारी, २०२५ ते दिनांक ३१ डिसेंबर, २०२५** (दोन्ही दिवस धरून) या कालावधीत प्रकाशित झालेली व प्रत्यक्षात बाजारात उपलब्ध असलेली असावीत.

(२) या स्पर्धेसाठी प्रवेशिका व पुस्तके स्वीकारण्याचा कालावधी **दिनांक १ जानेवारी, २०२६ ते ३० जानेवारी, २०२६** असा राहील. **दिनांक ३० जानेवारी ,२०२६ या विहित कालमर्यादेनंतर येणाऱ्या प्रवेशिका स्पर्धेसाठी स्वीकारल्या जाणार नाहीत.**

(३) ही स्पर्धा महाराष्ट्रातील आणि महाराष्ट्राबाहेरील **सर्व मराठी भाषिक** लेखकांसाठी आणि प्रकाशकांसाठी खुली आहे.

(४) या स्पर्धेमध्ये भाग घेण्यासाठी कोणतेही स्पर्धा शुल्क नाही. स्पर्धेच्या प्रवेशिकांसाठी आवश्यक प्रवेशिका व माहितीपत्रक सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, मुंबई यांच्या कार्यालयात, तसेच मंडळाच्या **https://sahitya.marathi.gov.in** या संकेतस्थळावर, महाराष्ट्र शासनाच्या **www.maharashtra.gov.in** या संकेतस्थळावर तसेच राज्यातील सर्व (मुंबई शहर व मुंबई उपनगर हे दोन जिल्हे वगळून) जिल्हाधिकारी कार्यालयातही उपलब्ध होतील.

(५) मुंबई शहर व मुंबई उपनगर या दोन जिल्ह्यातील लेखक / प्रकाशकांनी पुस्तकाच्या दोन प्रतींसह विहित नमून्यातील प्रवेशिका सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५ येथे पाठवाव्यात.

(६) या योजनेखालील स्पर्धेमध्ये ज्या लेखकांना एका विशिष्ट लेखन प्रकारामध्ये तीन वेळा पारितोषिके मिळाली असतील अशा लेखकांना त्याच लेखन प्रकारांमध्ये या स्पर्धेसाठी पुस्तक/पुस्तके पाठविता येणार नाही.

(७) पुस्तकांची फक्त **प्रथम आवृत्तीच** स्पर्धेकरिता पात्र ठरेल.

(८) पुस्तकात प्रकाशन **दिनांक, वर्ष, प्रथम आवृत्ती छापलेले असणे आवश्यक आहे.** तारखेचा, वर्षाचा व आवृत्तीचा **रबरी शिक्का अथवा चिकटवलेली पट्टी ग्राह्य धरण्यात येणार नाही**.

(९) या स्पर्धेसाठी **हस्तलिखित किवा टंकलिखित पुस्तकांचा** विचार केला जाणार नाही.

(१०) यापूर्वी राज्य किंवा साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेल्या पुस्तकांमधील काही भागाचा समावेश एखाद्या पुस्तकात केला असल्यास, अशी पुस्तके स्पर्धेसाठी पात्र ठरणार नाहीत.

(११) साहित्य अकादमीचे पुरस्कार मिळालेल्या पुस्तकांचा या स्पर्धेसाठी विचार केला जाणार नाही.

(१२) स्पर्धेसाठी दाखल करावयाच्या पुस्तकाचे लेखक एकापेक्षा अधिक असतील आणि या सर्व सहलेखकांपैकी एखादा लेखक जरी स्पर्धेच्या इतर नियमांप्रमाणे त्या लेखन प्रकारात भाग घेण्यास अपात्र ठरत असेल तर ते पुस्तक त्या लेखन प्रकारात भाग घेण्यास अपात्र समजण्यात येईल.

(१३) दिवंगत लेखकाच्या पुस्तकाची प्रवेशिका या स्पर्धेसाठी अपात्र समजण्यात येईल. दिवंगत लेखकाच्या पुस्तकाची प्रवेशिका प्रकाशक, नातेवाईक वा इतर अन्य कुणालाही स्पर्धेसाठी सादर करता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास सदर प्रवेशिका व पुस्तक स्पर्धेसाठी अपात्र ठरवले जाईल.

(१४) प्रवेशिकेमध्ये स्पर्धेसाठी पाठविण्यात येणाऱ्या पुस्तकाच्या वाङ्मय प्रकाराचा व विभागाचा उल्लेख **प्रवेशिकेमध्ये अचूकपणे नमूद करणे** आवश्यक आहे. अन्यथा प्रवेशिकेवर वाङ्मय प्रकार व विभाग अचूकपणे नमूद करण्यात आला नसल्यास प्रवेशिका अपात्र समजण्यात येईल.

(१५) एक पुस्तक फक्त एकाच विभागातील फक्त एकाच वाङ्मय प्रकारात सादर करता येईल, ते एकापेक्षा अधिक विभागात व वाङ्मय प्रकारात सादर करता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास ते पुस्तक सादर केलेल्या विभागातून व वाङ्मय प्रकारातून बाद करण्यात येऊन स्पर्धेसाठी अपात्र समजण्यात येईल.

(१६) अपूर्ण प्रवेशिका विचारात घेतल्या जाणार नाहीत. तसे निदर्शनास आल्यास त्या प्रवेशिका स्पर्धेसाठी अपात्र समजण्यात येतील.

(१७) परीक्षण मंडळावर अथवा मंडळ सदस्यांवर दबाव येतो आहे, असे सिध्द झाल्यास ज्या प्रवेशिकांबाबत हा दबाव येत असेल ती प्रवेशिका **विचारात घेतली जाणार नाही.**

(१८) एखाद्या व्यक्तीचे पुस्तक दुसऱ्या व्यक्तिकडून शब्दांकित केले असल्यास असे शब्दांकित पुस्तक स्पर्धेसाठी सादर करता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास सदर पुस्तक स्पर्धेसाठी अपात्र समजण्यात येईल.

(१९) या योजनेतील सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार या विभागात फक्त महाराष्ट्राबाहेरील **मराठी भाषिक** लेखकालाच त्याचे पुस्तक स्पर्धेसाठी सादर करता येईल. महाराष्ट्रातील लेखकाला सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार या विभागात त्याचे पुस्तक स्पर्धेसाठी सादर करता येणार नाही तसे निदर्शनास आल्यास महाराष्ट्रातील सदर लेखकाचे पुस्तक स्पर्धेसाठी अपात्र समजण्यात येईल.

(२०) या योजनेतील प्रथम प्रकाशन या विभागातील वाङ्मय प्रकारात फक्त नवलेखकांनाच (नवलेखक म्हणजे ज्याचे आतापर्यंत एकही पुस्तक प्रकाशित झाले नाही, असा लेखक) त्यांचे पहिले पुस्तक स्पर्धेसाठी सादर करता येईल. नवलेखकांशिवाय अन्य लेखकांना, ज्यांची एकापेक्षा अधिक पुस्तके प्रकाशित झाली आहेत अशा लेखकांना प्रथम प्रकाशन विभागातील वाङ्मय प्रकारात पुस्तक सादर करता येणार नाही. तसे निदर्शनास आल्यास सदर पुस्तक स्पर्धेसाठी अपात्र समजण्यात येईल. प्रथम प्रकाशन या विभागातील वाङ्मय प्रकारात नवलेखकांना स्पर्धेसाठी पुस्तक सादर करताना प्रवेशिकेसोबतचे जोडपत्र - ५ प्रमाणित

करून प्रवेशिकेसोबत सादर करणे बंधनकारक राहील. जोडपत्र - ५ प्रमाणित करून प्रवेशिकेसोबत सादर न केल्यास सदर प्रवेशिका व पुस्तक स्पर्धेसाठी अपात्र समजण्यात येईल.

(२१) कोणत्याही विभागातील लेखन प्रकारांमध्ये अपेक्षित दर्जाचे पुस्तक न आढळल्यास कोणतेही पारितोषिक दिले जाणार नाही. याबाबतचा अंतिम निर्णय निवड समितीचा राहील.

(२२) सदर स्पर्धेसाठी पुस्तक सादर करीत असलेल्या लेखकास (प्रथम प्रकाशन वगळून) यापूर्वी मिळालेल्या शासनाच्या राज्य वाङ्मय पुरस्काराची स्वतंत्र यादी, तपशिलासह (पुस्तकाचे नाव, वाङ्मय प्रकार, मिळालेला पुरस्कार व वर्ष इ.) लेखकांनी स्वतः स्वाक्षरीसह प्रमाणित करून प्रवेशिकेसोबत सादर करणे आवश्यक राहील.

(२३) सदर स्पर्धेसाठी प्रवेशिका व पुस्तक हे पुरस्कार स्पर्धेच्या नियमावलीनुसार सादर करणे आवश्यक राहील. सदर पुरस्कार स्पर्धेसाठी प्राप्त होणाऱ्या सर्व प्रवेशिका व पुस्तके यांची तपासणी राज्य वाङ्मय पुरस्कार छाननी समितीकडून केली जाईल. तपासणीअंती प्रवेशिका व पुस्तकाच्या पुरस्कार स्पर्धेसाठीच्या पात्र व अपात्रतेबाबत छाननी समितीकडून घेण्यात आलेला निर्णय हा अंतिम राहील.

(२४) महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळावरील शासन नियुक्त सदस्य वगळता इतरांना उक्त पुरस्कारासाठी पुस्तके सादर करता येतील.

(२५) ज्या लेखकांना, प्रकाशकांना या योजनेत भाग घ्यावयाचा असेल त्यांनी प्रत्येक प्रवेशिका प्रपत्रासोबत, आपल्या पुस्तकांच्या **दोन प्रती** पुढील नमुन्यातील अर्जासह संबंधित जिल्ह्याच्या **जिल्हाधिकारी कार्यालयामार्फत सचिव, महाराष्ट्र राज्य साहित्य आणि संस्कृती मंडळ, रवींद्र नाट्य मंदिर इमारत, दुसरा मजला, पु.ल. देशपांडे महाराष्ट्र कला अकादमी आवार, सयानी मार्ग, प्रभादेवी, मुंबई - ४०० ०२५** यांजकडे पाठवाव्यात, स्पर्धेसाठी दिलेल्या पुस्तकाच्या प्रती स्पर्धकास नंतर परत करण्यात येणार नाहीत.

***********

**<u>जोडपत्र - ३</u>**

## स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्‌मय पुरस्कार

## प्रवेशिका

(१) पुस्तकाचे नाव :

(२) विभाग (अ) प्रौढ वाङ्‌मय (२२ साहित्य प्रकार)
(ब) बाल वाङ्‌मय (६ साहित्य प्रकार)
(क) प्रथम प्रकाशन (६ साहित्य प्रकार)
(ड) सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र पुरस्कार (**सर्व** साहित्य प्रकार)

(३) वाङ्‌मय प्रकार (पुस्तिकेत दर्शविल्याप्रमाणे) :

(४) लेखकाचे नाव व संपूर्ण पत्ता (ई-मेल आयडीसह)
(अ) दूरध्वनी क्रमांक/मोबाईल क्रमांक :
(आ) लेखकाचे ज्या नावे बँकेत खाते आहे ते नाव :
(इंग्रजीमध्ये कॅपिटल अक्षरात)
(बँकेचे नाव किंवा खाते क्रमांक नाही.)

(५) प्रकाशकाचे नाव, पत्ता व दूरध्वनी क्रमांक/मोबाईल क्रमांक :

(६) प्रकाशन दिनांक :

(७) लेखन संपूर्ण स्वतंत्र आहे का ? :
या पुस्तकाची ही प्रथम आवृत्ती आहे काय ? :

(८) ज्या लेखन प्रकारात या पुस्तकाचे वर्गीकरण होते त्या लेखन प्रकारातील पुस्तकांना राज्य शासनाच्या या योजनेअंतर्गत लेखकाला पूर्वी पुरस्कार मिळाला आहे काय ? असल्यास, किती वेळा ? :

(९) या पुस्तकाला साहित्य अकादमीचा पुरस्कार मिळाला आहे काय ? :

(१०) या पुस्तकामध्ये यापूर्वी राज्य किंवा साहित्य अकादमी पुरस्कार मिळालेल्या पुस्तकातील भाग समाविष्ट आहे काय ? :

(११) सोबत खालील बाबी जोडल्या आहेत काय :
(अ) पुस्तकांच्या दोन प्रती :
(ब) लेखकाच्या साहित्यक्षेत्रातील कार्याचा व अन्य माहितीचा तपशील दोन प्रतीत (फक्त ३० ओळी) व त्यावर चिकटवलेले दोन फोटो आवश्यक आहेत :
(क) लेखकाचे वा प्रकाशकाचे सोबतच्या विहित नमुन्यातील प्रमाणपत्र :

**टीप -** (१) वरील अनुक्रमांक (३)**<u>येथे दर्शविलेल्या वाङ्‌मय प्रकाराचे वर्गीकरण चुकीचे नमूद केल्यास प्रवेशिका रद्द करण्यात येईल.</u>**
(२) वाङ्‌मय प्रकार हा अर्जदाराने स्वहस्ताक्षरात लिहिणे आवश्यक आहे.

वरील दिलेली माहिती आणि तपशील सत्य आहे.

(सही)

**प्रवेशिका पाठविणाऱ्याचे नाव, पत्ता आणि दूरध्वनी क्रमांक .. .. .. .. ..** **प्रकाशक /लेखक**

**<u>जोडपत्र - ४</u>**

**<u>स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना</u>**

**<u>लेखक अथवा प्रकाशक यांनी</u>**

**प्रौढ, बाल वाङ्मय व सरफोजीराजे भोसले बृहन्महाराष्ट्र या विभागासाठी द्यावयाचे प्रमाणपत्र**

(१) प्रमाणित करण्यात येते की, ____________________________ या पुस्तकाचा प्रकाशनाचा अचूक दिनांक _______________ हा आहे.

(२)___________________________ या पुस्तकातील लिखाण लेखकाचे स्वत:चे आणि स्वतंत्र असून सदर पुस्तकात पूर्वी राज्य किंवा साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेल्या पुस्तकांमधील किंवा अन्य कोणत्याही इतर पुस्तकांमधील कुठल्याही भागाचा (मजकूराचा) समावेश केलेला नाही, तसेच सदर पुस्तकाची ही प्रथम आवृत्ती आहे.

(३)स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार या योजनेखाली लेखकाला __________ या लेखन प्रकारातील तीन किंवा अधिक वेळा पारितोषिके मिळालेली नाहीत.

(सही)

लेखक /संपादक/ अनुवादक/ प्रकाशक

नाव ______________________________

रबरी शिक्का

Raut

**जोडपत्र - ५**

## स्व. यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार योजना

**लेखक अथवा प्रकाशक यांनी**

**प्रथम प्रकाशन या विभागासाठी द्यावयाचे**

**प्रमाणपत्र**

१) प्रमाणित करण्यात येते की, माझे (लेखकाचे) स्वतःचे एकही पुस्तक यापूर्वी प्रकाशित झालेले नाही. _______________ हे माझे (लेखकाचे) स्वतःचे प्रकाशित झालेले पहिलेच पुस्तक असून या पुस्तकाच्या प्रकाशनाचा अचूक दिनांक _______________ हा आहे.

२) ___________________________ या पुस्तकातील लिखाण माझे (लेखकाचे) स्वतःचे आणि स्वतंत्र असून सदर पुस्तकात पूर्वी राज्य किंवा साहित्य अकादमीचे पारितोषिक मिळालेल्या पुस्तकांमधील किंवा अन्य पुस्तकांमधील कुठल्याही भागाचा (मजकूराचा) समावेश केलेला नाही.

३) स्व.यशवंतराव चव्हाण राज्य वाङ्मय पुरस्कार या योजनेतील प्रथम प्रकाशन विभागातील __________________ या वाङ्मय प्रकारात स्पर्धेसाठी सादर करण्यात आलेले ___________________ हे पुस्तक माझे स्वतःचे (लेखकाचे) पहिलेच प्रकाशित (प्रथम प्रकाशन) पुस्तक असून तसे याद्वारे मी प्रमाणित करीत आहे.

(सही)

लेखक / प्रकाशक

नाव ______________________________

रबरी शिक्का

Raut